| **MHNS240004952013** | पांडूरंग शामराव वनीस<br><br>वि.<br><br>इंदुबाई दगा वनीस व इतर |
| --- | --- |

निशाणी १११ वरील आदेश

वादी यांनी सदरचा अर्ज प्रतिवादी क्र. ९, १०, १२ व १४ चे वारस रेकॉर्डवर आणणेस झालेला विलंब माफ होऊन मिळणेसाठी दाखल केला आहे.

२. वादी यांचा अर्ज व त्यावर प्रतिवादी यांनी दाखल केलेले म्हणणे वाचले दोन्ही बाजूंचा युक्तीवाद ऐकला. दोन्ही बाजूंनी त्यांच्या अर्जातील कथनाप्रमाणेच युक्तीवाद केलेला आहे.

३. वादी यांचे असे कथन आहे की, वादीने वाटपासाठी दावा दाखल केला आहे. प्रतिवादी क्र. ९, १०, १२ व १४ यांना समन्स मिळूनही ते न्यायालयात हजर राहिले नाहीत व त्यांच्याविरुद्ध एकतर्फी आदेश झाला. दरम्यान, हे प्रतिवादी मयत झाले असून त्यांच्या वारसांनी त्रयस्थ अर्ज दाखल केला आहे. वादीला याबाबत पूर्वी माहिती नसल्यामुळे वारसांना रेकॉर्डवर आणण्यात विलंब झाला (प्रतिवादी ९ – २८१९ दिवस, १० – ३८२७ दिवस, १२ – ३४१४ दिवस, १४ – ४३०९ दिवस). तथापि, न्यायनिवाड्यासाठी मयत प्रतिवादींचे वारस रेकॉर्डवर घेणे आवश्यक असून त्यामुळे दाव्याच्या स्वरूपात कोणताही बदल होणार नाही; अन्यथा वादीस

अपूरणीय नुकसान होईल. परंतु प्रस्तुत दावा स्थावर मिळकतीसंदर्भात असून मयत प्रतिवादींचे वारस रेकॉर्डवर घेणे आवश्यक आहे. विलंब हा केवळ कागदपत्रे वेळेवर उपलब्ध न झाल्यामुळे झाला आहे. अशा परिस्थितीत विलंब माफ न करून वारसांना रेकॉर्डवर घेण्यास परवानगी न दिल्यास वादी न्यायापासून वंचित राहून अपरिवर्तनीय नुकसान सहन करेल.

४. प्रतिवादी यांनी आपले म्हणणे सादर करुन असे कळविले आहे की, वादीने केलेला अर्ज कायदेशिर व बरोबर नाही. वादीने मयत व्यक्तीचे वारस मुदतीत आणणे आवश्यक होते. दाव्यात पुरावा चालु असतांना देखील वादीने वारस रेकॉर्डवर आणले नाही. वादीने विलंब माफ होणेबाबत अर्जात कोणतेही संयुक्तीक कारण नमूद केलेले नाही. सबब प्रस्तुतचा अर्ज नामंजूर करणेत यावा अशी विनंती केली आहे.

५. वादी यांनी सदरचा दावा वाटपासाठी दाखल केला आहे. त्यामुळे सदर दाव्यात प्रत्येक पक्षकार हा आवश्यक पक्षकार म्हणून सामील असणे गरजेचे आहे. सदरच्या दाव्याचा गुणदोषावर निकाल करणेसाठी प्रतिवादी क्र.९, १०, १२, व १४ चे वारस रेकॉर्डवर येणे गरजेचे आहे, त्याकरीता वादी यांनी केलेला विलंब माफ होणे गरजेचे आहे. प्रतिवादी क्र. ९, १०, १२, व १४ चे वारस रेकॉर्डवर घेतल्यामुळे प्रतिवादी यांचे कोणतेही नुकसान होणार नाही. उलट दाव्याचा अंतिम न्यायनिर्णय करणेसाठी मदत होणार आहे. वादीनी वादीचे वारस रेकॉर्डवर घेणेस उशीर केला हे प्रथमदर्शनी दिसून येत आहे. त्यामुळे वादी यांना त्याचेवर त्यांनी केलेल्या उशीरासाठी खर्च बसवून सदरचा अर्ज मंजूर करणे न्यायोचीत वाटते. सबब खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

रे.मु.नं. ६१/२०१३
पांडूरंग वि. इंदुबाई

# <u>आदेश</u>

वादी यांचा निशाणी (नि.क्र.१११) वरील अर्ज, प्रतिवादी यांना खर्च दाखल रक्कम रुपये ५००/- (अक्षरी रुपये पाचशे मात्र) पुढील तारखेपर्यंत देणेच्या अटीवर मंजूर करण्यात येत आहे.

MADHUSUDAN DINKAR MAHADIK

Digitally signed by MADHUSUDAN DINKAR MAHADIK
Date: 2026.04.01 17:19:18 +0530

**ठिकाण : सटाणा** **( मधुसूदन दिनकर महाडीक )**

**दिनांक : ०१/०४/२०२६** **२ रे प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, सटाणा, जि. नाशिक**